**मोटार अपघात प्रकरण क्र.१९६/२०२४**
**सुनिल वि. अजित व ईतर.**
**निशाणी क्रमांक – २०**

**<u>साक्षीदाराची पुढील सरतपासणी मार्फत त्यांचे विधीज्ञ श्री.एस.एम. इंगळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

**१.** मी माझ्या साक्षीचे शपथपत्र न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. त्यातील मजकूर मी स्वतः वाचून पाहिलेला आहे. यादी निशाणी क्र.४ सोबत घटनेसंदर्भात पोलीसांनी नोंदविलेल्या जबाबाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र. २२** वर आहे. गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२३** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत **निशाणी क्र.२४** वर आहे. सहयाद्री मल्टीस्पेशालीटी ॲक्सीडेंट ॲंड न्युरो केअर सेंटर प्रा.लि. यांचे मूळ डिस्चार्ज कार्ड **निशाणी क्र.२५** वर आहे. एम.एल.सी. ची सत्यप्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२६** वर आहे. ट्रॅक्टर क्रमांक MH-24-BX-0906 चे आरटीओ नोंदणी दस्तावेजाची छायांकित प्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२७** वर आहे. अपघात करणाऱ्या वाहनचालकाच्या वाहन चालवण्याच्या परवान्याची प्रतीची छायांकित प्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२८** वर आहे. अपघात करणाऱ्या वाहनाचा आरटीटो कार्यालयाने दिलेला तपशीलाची छायांकित प्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.२९** वर आहे. ट्रॅक्टर क्रमांक MH-24-BX-0906 च्या विमा पॉलीसीची प्रतीची छायांकित प्रत दाखल केली आहे. ती **निशाणी**

**क्र.३०** वर आहे. माझे शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत दाखल केली आहे. ती **निशाणी क्र.३१** वर आहे.

**<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.पी.व्ही. कांबळे यांच्यातर्फे</u>**

२. अधिवक्ता गैरहजर, सबब उलटतपास काही–नाही.

**<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.एस.जी.डोईजोडे यांच्यातर्फे</u>**

३. सध्या माझी शिक्षक म्हणून नोकरी चालू आहे. मी ज्या शाळेमध्ये शिकवतो त्या शाळेची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत असते. माझे शाळेपासून माझे घराचे अंतर १८ कि.मी. आहे. माझी शेत जमीन चाकूर, बोळका आणि सफेपुर, जिल्हा बीड येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नोकरीमुळे दररोज मी माझे शेतात जावू शकत नाही. मी माझी शेती बटईने करुन घेतो. शेती बटईने करुन घेण्याबद्दल मी कोणतेही दस्तऐवज माझे दाव्यामध्ये दाखल केलेला नाही. मला शेतीपासून मिळत असलेल्या उत्पन्नाबद्दल मी दाव्यामध्ये कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे दाव्यामध्ये आणि शपथपत्रामध्ये शेतीच्या उत्पन्नाबद्दल जे मी कथन केलेले आहे, त्याबद्दल माझेकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शेतीवर मी देखरेख करत नव्हतो.

४. हे म्हणणे खरे नाही की, औषधोपचारासाठी माझा जो काही खर्च झाला, तो मी शासनाकडून घेतला आहे. मी माझे शाळेतून याबाबत पत्र आणून देवू शकतो की, औषधोपचारासाठी झालेला खर्च मी शासनाकडून मागितलेला

नाही. अपघाताच्यापुर्वी मी शिक्षक म्हणून काम करत होतो आणि त्यानंरतही मी आजपर्यंत शिक्षक म्हणून काम करत आहे. माझे पगारामध्ये काहीही फरक पडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वेळोवेळी पगार वाढीचा फायदा मिळालेला आहे. मी काम व्यवस्थीत करत नाही, म्हणून मुख्याध्यापक साहेब श्री. पठाण यांनी मला एकदा मेमो दिलेला आहे. तो मेमो मी हया दाव्यामध्ये दाखल करु शकतो. त्या मेमोला मी कोणतेही लेखी उत्तर दिलेले नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये झालेल्या जखमामुळे माझे नोकरीवर किंवा माझे उत्पन्नावर कोणताही फरक पडलेला नाही. मी माझे वरिष्ठांकडे याबद्दल अर्ज केला नाही की, माझे अपंगत्वामुळे मला पर्यायी काम / कर्तव्य देण्यात यावे. सध्या मला जो पगार मिळत आहे, त्यावर माझे कुटूंब अवलंबून आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझे चुकिमुळे झाला. अपघाताचेवेळी मी माझे शाळेमधून घरी यायला मोटार सायकलवर निघालो होतो. अपघातानंतर सात–आठ दिवसांनी मी माझा जबाब पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे शपथपत्रामध्ये चुकिचे नमूद केले आहे की, अपघातापुर्वी ट्रॅक्टर चालकाचा ट्रॅक्टरवरील ताबा सुटला होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये ट्रॅक्टर चालकाची कोणतीही चुक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात हा माझे चुकिमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर चालकविरुध्द मी खोटा फौजदारी खटला करायला लावला. ट्रॅक्टर चालकाविरुध्द दाखल झालेल्या खटल्यामध्ये आत्तापर्यंत निकाल लागलेला

नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रामध्ये मी माझे चुकिचे वय नमूद केले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रामध्ये मी माझे औषधोपचाराचा खर्च व दाव्यामध्ये दाखल केलेले बिलं खोटे आहेत.  हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

दिनांक :- ०१/०८/२०२६

(आर.बी.भागवत)

जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा

सदस्य मोटार अपघात प्रा.,लातूर